स्थापना : जून २००० (शासन क्र. एनजीसी २०००/न.म.वि.(१/२०००)म.शि.-३/दि. २८ जून २०००)

College Code No. : 337 — महाविद्यालय कोड क्र. ३३७

Amrut Sevabhavi Sanstha Parbhani's
**Late Ku. Durga K. Banmeru Science College,**
(B.Sc.,B.B.A.,B.C.A.,M.Sc.(Comp. Science))
Loni Road, Lonar Dist. Buldhana - 443302
Ph./Fax No. : 07260 - 221315
(Affiliated to Sant Gadgebaba Amravati University, Amravati & UGC 2 (f) & 12 (B) approved)

अमृतं तु विद्या। विज्ञानं यज्ञ तनुते ।।

अमृत सेवाभावी संस्था, परभणी द्वारा संचलित
**कै.कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय,**
(बी.एस्सी.,बी.बी.ए.,बी.सी.ए.,एम.एस्सी. (कॉम्प्यु.सायन्स))
लोणी रोड, लोणार जि. बुलढाणा - ४४३३०२
दूरध्वनी / फॅक्स क्र. : ०७२६० - २२१३१५
(संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नीत व युजीसी २ (एफ) व १२(बी) मान्यता प्राप्त)

www.lkdkbanmerucollege.ac.in E-mail : pkbanmeru@yahoo.co.in; lkdkbscl@rediffmail.com

Dr. Prakash K. Banmeru, Principal — Dr. Santosh K. Banmeru, Secretary

डॉ.प्रकाश क. बनमेरू, [redacted] प्राचार्य — डॉ.संतोष क. बनमेरू, सचिव

# 'युवा भारत'या विषयावर युवा दिनानिमित्त ऑनलाईन मार्गदर्शन
# (१२ जानेवारी २०२१ )

दि.१२ जानेवारी २०२१ रोजी कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविध्यालय व कै.कमलाबाई क.बनमेरू कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लोणार यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फात दि.१२ जानेवारी रोजी महाविद्यालयात माँ साहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती व राष्ट्रीय युवक दिन ऑनलाईन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचा मुख्य विषय 'युवा भारत' हा होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य,डॉ.प्रकाश क.बनमेरू तर प्रमुख मार्गदर्शक मा.श्री विठ्ठल चव्हाण हे होते. सदर कार्यक्रमाची सुरवात माँ साहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रथम प्रास्ताविकामध्ये प्रा.शिवशंकर मोरे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करून माँ साहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याबद्दल, तसेच युवक दिन का साजरा केला जातो याबाबद माहिती सांगितली. त्या नंतर प्रमुख मार्गदर्शक मा.श्री.विठ्ठल चव्हाण सर यांनी आजच्या युवकांनी उपलब्ध असलेल्या साधान सामग्री चा उपयोग करून आपले जीवनमान उंचावेल याकडे लक्ष दिले पाहिजेत.त्याचप्रमाणे स्वामी विवेकानंद यांनी विक्रमी विश्वविजय संपादन करून १८९७ साली भारतात परतल्यावर त्यांच्या पहिल्या वहिल्या भाषणात मद्रास येथील युवकांसाठी आवाहन केले होते. 'हे, भारतातील युवकांनो, आता उठा! जागे व्हा! आणि ध्येय प्राप्त झाल्याशिवाय थांबू नका. तेहतीस कोटी देव देवतांची बंदिस्त मंदिरात पूजा प्रार्थना

करण्याऐवजी आपली शक्ती व वेळ या विराट अशा भारतमातेस अर्पण करून राष्ट्र उभारणीस युवकांनी हातभार लावावा असे स्वामिनी सांगितले असा मोलाचा संदेश दिला असे त्यांनी सांगितले.ग्रामीण भागातील युवक सातत्याने पुढे जात आहे. त्याला असंख्य अशया अडचणी आहेत,परंतु या अडचणीवर मत करून युवकांनी आपले भविष्य उज्ज्वल केले पाहिजेत असे ते म्हणाले.आज सामाजिक दृढ भावना असलेला युवक समाजापुढे येणे आवश्यक आहे.यानंतर महाविध्यालायचे प्राचार्य,यांनी भारत हा जगातील सर्वात मोठा युवक असेलेला देश आहे. युवकांनी पुढे येऊन उच्च शिक्षण घेऊन विज्ञान आणि तंत्रज्ञानाने समृद्ध करणे गरजेचे आहे असे ते म्हणाले व उपस्तीत सर्वांचे आभार व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शिवशंकर मोरे तर तंत्रज्ञ सहायक प्रा.राम देव्हडे व श्री.अनिल बनमेरू यांनी सहकार्य केले.यावेळी महाविध्यालायातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थीत होते.






माँ साहेब जिजाऊ व स्वामी विवाकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करतांना प्रा.शिवशंकर मोरे व मा.श्रो.अनिल बनमेरू तसेच मार्गदर्शन करतांना मा.श्री.विठ्ठल चव्हाण सर






कार्यशाळेसाठी ऑ न ला ई न उपस्थित स्वयंसेवक प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी